# ठाणे परिसरातील कष्टकरी आदिवासी बंधु–भगिनींना

## लाल निशाण पक्ष व कष्टकरी संघटनेचे एकदिलाचे व एकजुटीचे निवेदन

१) सटाण्याच्या महाराष्ट्र राज्य शेतमजूर परिषदेच्या वेळी (१९८२) लाल निशाण पक्षाचे कार्यकर्ते व कष्टकरी संघटनेचे कार्यकर्ते यांची एकमेकांशी प्रथम ओळख झाली. गेल्या चार वर्षांच्या काळात हा परिचय वाढत गेला. दोघांनी मिळून काही जनसंघटना व जनआंदोलने उभारण्याचा प्रयत्न केला. काही महाराष्ट्र राज्यव्यापी आंदोलनांत इतरासह आम्ही दोन्ही संघटनांच्या कार्यकर्त्यांनी भाग घेतला. या क्रमात अनेक वेळा आम्ही विचारांची देवाणघेवाण करू शकलो. त्यातून आमच्यामध्ये जे मतैक्य निर्माण झाले आहे त्या आधारे आमच्या दोन्ही संघटनांच्या कार्यकर्त्यांच्यासाठी, तसेच निरनिराळ्या निमित्ताने ज्यांच्याशी आमचा सहकार्य अथवा संघर्ष होतो अशा संघटनांच्या कार्यकर्त्यांसाठी आणि अर्थातच ज्या जनतेच्या जागृतीचे व संघटनेचे कार्य करणे हे आम्हा दोन्ही संघटनांचे स्वच्छेने स्वीकारलेले उद्दिष्ट आहे त्या जनतेला, विशेषतः दोघांचे जेथे समान कार्यक्षेत्र आहे अशा ठाणे जिल्ह्यातील जनतेला उद्देशून हे निवेदन आम्ही करीत आहोत.

२) देश स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असताना ठाणे जिल्ह्यातील आदिवासी समाज, विशेषतः वारली समाज त्यावेळी एकत्र असलेल्या हिंदी कम्युनिस्ट पक्षाने जागवला. कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने त्यावेळी हे कार्य हाती घेतलेल्या कै. कॉ. शामराव परुळेकर व कॉ. गोदूताई परुळेकर या पति–पत्नींनी अपार परिश्रम करून व कष्ट सोसून जंगलच्या राजाला लग्नगड्यांच्या गुलामी प्रथेतून मुक्त होण्यासाठी जागे केले, संघटित केले आणि लढायला शिकवले. त्या वेळच्या (१९४८ च्या) काँग्रेस मंत्रिमंडळाने या आंदोलनावर निर्घृणपणे वरवंटा फिरवला. महाराष्ट्रभरच्या कम्युनिस्ट पक्षाबरोबरच अनेक डाव्या विचारांच्या– शे. का. पक्ष व नवजीवन संघटना– प्रमुख कार्यकर्त्यांना स्थानबद्ध करण्यात आले. पण त्याचबरोबर ठाणे जिल्ह्यातील सावकार, जमीनदार, व्यापारी आदीकडून चाललेल्या आदिवासींच्या अमानूष पिळवणुकीची दखल सरकारला घ्यावी लागली. त्या काळातच कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली उभ्या राहिलेल्या तेलंगणच्या शेतकऱ्यांच्या निझामशाहीविरोधी उठावाची नोंद घेऊन विनोबा भूदानाचा मंत्रोच्चार करीत तेलंगणात गेले तर मुंबई राज्याच्या काँग्रेस सरकारने १९४८ सालच्या कायद्याप्रमाणे, फक्त ठाणे जिल्ह्यात, शेतमजुरांना किमान वेतन कायदा लागू करून किमान वेतन जाहीर केले. सबंध महाराष्ट्र राज्यासाठी शेतमजुरांना किमान वेतन लागू व्हायला मात्र १९७४ साल उजाडावे लागले हे लक्षात घेतले म्हणजे १९४८ साली गुलामाचे जिणे जगणाऱ्या आदिवासींनी लाल बावट्याच्या नेतृत्वाखाली ठाणे जिल्हा किती हादरवला असला पाहिजे याची आजही कल्पना येऊ शकते.

३) ठाणे जिल्ह्यातील आदिवासी कष्टकऱ्यांच्या या उठावाची आम्ही कृतज्ञापूर्वक आणि अभिमानपूर्वक आठवण करतो. गेल्या ४० वर्षांत देशाच्या आणि महाराष्ट्राच्या जीवनात, शहरी जीवनाबरोबरच ग्रामीण जीवनात व शेतीक्षेत्रात मोठे बदल झाले. बदलते ग्रामीण जीवन लक्षात घेऊन भूमिहीन, शेतमजूर व गरीब शेतकरी थरात संबंध बांधण्यासाठी लाल निशाण पक्षाच्या कार्यकर्त्यांनी या थराशी संबंधित कनिष्ट सरकारी, निमसरकारी नोकरवर्गाच्या संघटना बांधण्याचे प्रयत्न सुरू केले व त्यांना त्यात साथही चांगली मिळाली. हे बदल घडत असतानाच महाराष्ट्र राज्याचे १९७० सालचे वनमंत्री नासिकराव तिरपुडे यांच्या अमदानीत ठाणे जिल्ह्यांत वनखात्याच्या अधिकाऱ्यांनी आदिवासींनी कष्टाने पिकवलेल्या शेतीची–अतिक्रमित जमीन–नासधूस केली. जंगल हे आदिवासींचे जीवन. ते सरकारने व कंत्राटदारांनी बळकावले आणि आदिवासींना अतिक्रमक ठरवले.

त्यावेळी श्रीरामपूर येथे-१९७०साली नव्याने वाढलेल्या सहकारी साखर कारखानदारीच्या अड्ड्यात, पहिली महाराष्ट्र राज्य भूमिहीन शेतमजूर, गरीब शेतकरी परिषद भरविण्यात आली. ही परिषद भरवण्यात लाल निशाण पक्ष, आता विभक्त झालेल्या कम्युनिस्ट चळवळीचे अखिल भारतीय कम्युनिस्ट पक्ष व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष सहभागी होते. जंगलच्या जमिनी आदिवासींना वहिवाटण्यासाठी हक्काने दिल्या पाहिजेत व त्यांच्या सहकार्याने जंगलची जोपासना केली पाहिजे ही मागणी श्रीरामपूर परिषदेने ठामपणे केली. त्याचबरोबर ज्याच्या हाताला घट्टा त्यालाच जमिनीचा पट्टा व शेतमजुरांना किमान वेतन या घोषणा पुढे आणल्या. या परिषदेच्या पाठोपाठ, परिषदेत ठरल्याप्रमाणें, मुंबईत ग्रामीण गरिबांचे प्रचंड निदर्शन करण्यात आले. शिवसेनेच्या चढाईच्या त्या काळात महाराष्ट्रातील ग्रामीण कष्टकऱ्यांनी लालबावटे घेऊन कामगारवर्गाच्या मुंबई शहरात केलेले निदर्शन ही एक विशेष घटना होती आणि या निदर्शनात ठाणे जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने आलेल्या वारली तरुण–तरुणींची भागीदारी अभिमानास्पद होती. यानंतर १९७१ मध्ये बेलवंडी, १९७३ मध्ये दहिवडी येथे भूमिहीन शेतमजूर गरीब शेतकरी परिषदेची अधिवेशने झाली. बेलवंडीची परिषद मध्यम कष्टकरी शेतकऱ्यांच्या उपस्थितीने व त्यांच्या प्रश्नावरील खास ठरावाने गाजली होती. धनिक शेतकऱ्यांकडून सक्तीने कर्जवसुली करण्यात यावी व गरीब, सीमांत मध्यम कष्टकरी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात यावी अशा प्रकारची मागणी या अधिवेशनात पुढे आली. दहिवडीचे अधिवेशन ७२|७३ च्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर दुष्काळी भागाच्या केंद्रात, माण तालुक्यातील दहिवडीला झाले. या अधिवेशनाला दुष्काळ निवारण समितीचे–या समितीचे नवे नामकरण 'दुष्काळ निवारण निर्मूलन मंडळ' हे लगेचच झाले– अध्यक्ष वि. म. दांडेकर व उपाध्यक्ष शंकरराव मोहिते उपस्थित होते. दुष्काळ ही केवळ निसर्गापत्ती नसून ते मानवनिर्मित संकट आहे व दुष्काळाचे संपूर्ण निर्मूलन करणे शक्य आहे हा विचार दुष्काळविरोधी व्यवहारातील मुख्य नियामक सूत्र होता. ग्रामीण महाराष्ट्राच्या किमान १० ते १५ लाख लोकांना सर्वसामान्यतः रोजगाराची जरुरी असते व त्यांना उत्पादक कामे देऊन रोजगार उपलब्ध करण्यात आला पाहिजे. या दोन्ही सामाजिक गरजांची सांगड घालून 'दुष्काळ' निर्मूलनासाठी रोजगार हमी हे समीकरण पुढे मांडण्यात आले. त्याचबरोबर रोजगार हमी कामावरील स्त्री–पुरुष कामगारांना किमान वेतन, समान कामाला समान वेतन, कामाच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय, बालकांना ठेवण्यासाठी पाळणाघरे इत्यादी मागण्या पुढे मांडण्यात आल्या आणि या मागण्यांसाठी दुष्काळी कामावरील ५० लाख कामगारांपैकी १५ लाख कामगारांनी १५ मे १९७३ रोजी संप, निदर्शन केले आणि त्याच दिवशी दुष्काळी कामगारांच्या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी औद्योगिक कामगारांनी महाराष्ट्र राज्यव्यापी संप केला. काही संघटनांनी हा संप २५ मे रोजी केला. याशिवाय कामगारांनी दुष्काळग्रस्तांकरिता जमवलेला निधी सरकारकडे जमा न करता तो दुष्काळ निवारण समितीस दिला. दुष्काळी परिस्थितीचे तसेच तेथे सरकारतर्फे चाललेल्या कामाचे व निवारणकार्याचे निरीक्षण करण्यासाठी समितीतर्फे निरीक्षकांचे जाळे तयार करण्याचा प्रयत्नही झाला. पण स्थायी एकजुटीच्या अभावी संघटनात्मक उभारणीला स्थैर्य येऊ शकले नाही तरी एकंदर वातावरणाचा महाराष्ट्र शासनावर चांगलाच परिणाम झाला.

४) महाराष्ट्र शासनाला रोजगार हमी कायदा करावा लागला. ब्रिटिश राजवटीपासून आलेले अनुत्पादक दुष्काळी कामाचे धोरण रद्द करून सतत रोजगार उपलब्ध करण्यासाठी ग्रामीण भागात शेती सुधारणेची उत्पादक कामे काढण्याचे धोरण स्वीकारावे लागले. त्यासाठी खर्चाची तरतूद म्हणून कामगार–कर्मचाऱ्यांवर एक टक्का व्यावसायिक कर बसविण्यात आला. संघटित कामगारवर्गाने त्याचा प्रतिकार केला नाही.

५) या काळात जेथे जेथे शक्य होते तेथे तेथे शेतमजुरांच्या संघटना बांधण्याचे प्रयत्न लाल निशाण पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून सुरू असले तरी सर्वदूर शेतमजुरांच्या युनियन संघटना बांधण्याचे धोरण घेऊन काम सुरू झाले होते असे म्हणता येणार नाही. नगर जिल्ह्यात खटोड फार्म, सोमाणी फार्म, लाख फार्म यासारख्या ५० ते २०० शेतमजूर कायमपणे कामाला लावणाऱ्या भांडवली शेतमळ्यांवर तसेच शासनाच्या ठिकठिकाणी संघटित होणाऱ्या बीजगुणन केंद्रांवर, शेती महामंडळाच्या शेतमळ्यांवर आणि कृषि विद्यापीठाच्या शेतीवर शेतमजूर संघटित झाले, पण सतत वाढत असलेल्या असंघटित शेतमजुरांच्या सागरामध्ये संघटित शेतमजुरांची ही छोटी बेटे होती, तरीसुद्धा त्यांच्या हालचालींच्या परिणामी महाराष्ट्र शासनाला १९७४ साली महाराष्ट्रभर शेतमजुरांना किमान वेतन कायदा लागू करून किमान वेतन जाहीर करावे लागले. अर्थात ते किमान वेतन अतिशय तुट-

पुंजे होते. त्यात खास भत्त्याची तरतूद नव्हती. किमान वेतनाकरिता कायम बागायती, हंगामी बागायती, कोरडवाहू व दुष्काळी असे चार विभाग करण्यात आले, तरीसुद्धा ४८ साली ठाण्यात किमान वेतन कायदा-लागू झाल्यानंतर जो क्रम थबकला होता, तो १९७४ साली २६ वर्षानंतर व महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर १४ वर्षांनी पुन्हा प्रवाही झाला. शेतमजुरांना सबंध राज्यभर स्वतंत्ररित्या युनियन संघटनांमध्ये संघटित करण्याची वेळ आली आहे हे ओळखून, लाल निशाण पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पहिली महाराष्ट्र राज्य शेतमजूर परिषद भरविण्याचा विचार १९७५ च्या सुरुवातीस जाहीर केला होता. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर देशात इंदिरा काँग्रेस सरकारने जून १९७५ मध्ये आणीबाणी जाहीर केली. एका बाजूला प्रतिगाम्यांना अटकेत टाकत असतानाच दुसऱ्या बाजूला कामगार, शेतमजुरादी कष्टकऱ्यांच्या सभा, प्रचार, निदर्शने, संघटनादी लोकशाही स्वातंत्र्यावर आणीबाणीने बंधने घातली. आणीबाणी उपाययोजनेचा भाग म्हणून जाहीर झालेल्या २० कलमी कार्यक्रमात शेतमजुरांच्या किमान वेतनाचा उल्लेख असला तरी अगोदरच जाहीर केलेल्या शेतमजूर परिषदेवर महाराष्ट्र शासनाने बंदी घातली. बऱ्याच प्रयत्नानंतर परिषद भरविण्यास परवानगी देण्यात आली, पण ती बंदिस्त जागेमध्ये घ्यावी, ध्वनिक्षेपक लावू नये, राजकीय प्रश्नांची चर्चा करू नये अशा प्रकारची बंधने घालून परवानगी देण्यात आली. शेतमजूर परिषद भरणे हाच मुळी नवा पायंडा असल्यामुळे बंधनांना न जुमानता लाल निशाण पक्षाच्या कार्यकर्त्यांनी ती परिषद कोल्हापूर येथे भरवली आणि पार पाडली. 'ग्रामीण श्रमिक' या नावाच्या पाक्षिकात त्या परिषदेचा सविस्तर वृत्तांत त्यावेळी प्रसिद्ध झाला होता.

६) महाराष्ट्र राज्य शेतमजूर परिषदेचे दुसरे अधिवेशन ७७ साली बारामती येथे सहकारी साखर कारखान्याच्या अड्ड्यातच भरवले गेले. कोल्हापूरप्रमाणे बारामती हा सहकारी साखर कारखान्याचा अड्डा होता. यावेळी आणीबाणी उठली होती. जनतेने बंधने झुगारली होती. जनता पक्षाचे सरकार आले होते. ग्रामीण धनिकांची मुजोर चढाई दलित आदिवासी शेतमजुरादी विरुद्ध सुरू झाली होती. त्या विरुद्ध ग्रामीण गरिबांच्या एकजुटीचे निशाण परिषदेने उभारले. या परिषदेत भारतीय कम्युनिस्ट व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे प्रतिनिधीही उपस्थित होते. त्यानंतरचे तिसरे, १९८२ चे अधिवेशन गिरणी कामगारांचा संप महाराष्ट्रात गाजत असताना नाशिक जिल्ह्यात सटाणा येथे झाले. त्या अगोदर सटाणा येथेच सधन शेतकरी हितसंबंधांचे कट्टर पुरस्कर्ते शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेचे अधिवेशन गाजून गेले होते. साहजिकच शेतमजुरांचे अधिवेशन तेथेच भरविण्यात औचित्य होते. ते अधिवेशन मजबूतपणे पार पडले. शेतमजुरांच्या कुटुंबात दोन मिळवते धरून दोघांची मिळून मिळकत किमान जीवन जगायला पुरेशी झाली म्हणजे खूप झाले अशी भूमिका घेणाऱ्या पागे समितीच्या शिफारशींचे सधन शेतकरीधार्जिणे स्वरूप सटाणा परिषदेने चव्हाट्यावर मांडले. सटाण्याच्या परिषदेत महाराष्ट्राच्या ग्रामीण गरिबांमध्ये काम करणाऱ्या निरनिराळ्या संघटनांनी, कार्यकर्त्यांच्या संचांनी भागीदारी केली होती. एवढेच नव्हे तर महाराष्ट्र राज्य हमाल पंचायतच्या एका प्रमुख पदाधिकाऱ्यांनी प्रातिनिधिक स्वरूपात परिषदेत भाषण करून शेतमजूर संघटनेला अभीष्टचिंतन केले होते. डॉ. दत्ता सामंतांनी सटाणा अधिवेशनाला हजेरी लावली व शेतमजुरांविषयीच्या भ्रातृभावना भाषण करून व्यक्त केल्या होत्या. या परिषदेकरता सटाण्याला कष्टकरी संघटनेच्या आदिवासी कार्यकर्त्यांची तुकडी उशिरा पोहचली. लालनिशाण पक्षाच्या कार्यकर्त्यांची बैठक चालू असताना हे कार्यकर्ते बैठकीला आले व तेव्हा त्यांचा लालनिशाण पक्षाच्या कार्यकर्त्यांशी प्रथम परिचय झाला.

७) कष्टकरी संघटनेचे प्रतिनिधी म्हणून आलेल्या कार्यकर्त्यांनी ज्यावेळी सहकार्याची इच्छा व्यक्त केली त्यावेळी लाल निशाण पक्षाच्या कार्यकर्त्यांनी त्यांना ही गोष्ट स्पष्ट केली होती की कम्युनिस्ट चळवळीतील एक भ्रातृघटक या नात्याने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष हा आम्हाला जवळचा वाटतो. कष्टकरी संघटनेबद्दल काही गंभीर आक्षेप घेण्यात आलेले आहेत. त्यांची शहानिशा करून घेणे आम्हाला आवश्यक आहे. याबाबतीत स्पष्टता आल्यानंतर तुमच्यासारख्या आदिवासी समाजातील कष्टकरी थरातील कार्यकर्त्यांशी सहकार्याने काम करण्यास आम्हाला मुळीच संकोच वाटणार नाही.

८) गेल्या चार वर्षांच्या सहवासातून आणि प्रसंगाप्रसंगाने एकत्र काम करण्याच्या अनुभवातून लाल निशाण पक्षाच्या कार्यकर्त्यांची खात्री पटली आहे की, कष्टकरी संघटना ही ठाणे जिल्ह्यातील आदिवासी कष्टकरी सीमान्त शेतकरी जनतेच्या चळवळीतील एक प्रवाह आहे. दापचरी प्रकल्पाच्या उभारणीच्या वेळी आदिवासी जनतेवर जो अन्याय झाला व जे अत्याचार झाले त्याविरुद्ध न्यायासाठी झगडण्याकरिता तरुण शिक्षित

आदिवासी कार्यकर्ते उसळून उत्स्फूर्तपणे उभे राहिले. हा प्रयत्न करताना त्यांनी इंटकचे एक कार्यकर्ते नाना सावंत यांची मदत घेतली होती. सरकारी दडपशाहीमळे ते ६० दिवसांचे संपआंदोलन मोडले गेले. बऱ्याच कार्यकर्त्यांना मारहाण झाली व कारावासही भोगावा लागला. सरकारी दडपशाहीच्या या अनुभवानंतर काही–सोळा एक– कार्यकर्त्यांनी स्वतःची वैचारिक व मानसिक सिद्धता करण्याकरिता राजकीय शिक्षण–शिबिरे संघटित केली व आपल्यासारख्या कार्यकर्त्यांचा अनुभव समजावून घेण्याकरता हे कार्यकर्ते श्रमिक संघटनेचे जेथे काम चालते त्या शहाद्याला रंगपूरला भूमिसेनेच्या केंद्राला गेले व आपणही असेच संघटित व्हावयाचे असा निर्णय घेऊन परतले. या पार्श्वभूमीवर हा प्रवाह दृग्गोचर होऊ लागला. वैचारिक अभ्यास शिबिरे आणि गरीब वारली जनतेची, नवीन परिस्थितीत सर्व बाजूंकडून जी कुचंबणा चालली होती त्याविरुद्ध आंदोलन उभारणे अशी कामे निश्चित करून या कार्यकर्त्यांनी कष्टकरी संघटनेचे काम सुरू केले. मार्क्स–लेनिनवाद हीच क्रांतिकारक विचारसरणी आहे आणि सर्व कष्टकऱ्यांनी ही विचारसरणी स्वीकारून आपली एकजूट व संघटना धनिकांच्याविरुद्ध व त्यांच्या सत्तेविरुद्ध उभारली पाहिजे या शिकवणुकीच्या पायावर कष्टकरी संघटनेचा पसारा वाढू लागला. व्यापाऱ्यांकडून अडाणी आदिवासींची होणारी फसवणूक, सावकारांकडून होणारी पिळवणूक व लबाडणूक, कंत्राटदारांकडून कमी पगारावर होणारी राबवणूक बेकायदेशीर जमिनी हिरावून घेणे, आदिवासी स्त्रियांची फसवणूक व त्यांच्यावर अत्याचार, जंगल अधिकारी व अन्य शासकीय अधिकारी यांचे जुलूम या सर्वांविरुद्ध छोटे छोटे पण निग्रहपूर्वक झगडे करत या चळवळीने आकार घेतला. शिबिरातून राजकीय शिक्षणाचा पाया घातला गेला. सामूहिक शक्तीने लढण्याचे वळण या चळवळीने घेतले. या भागातील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत होते आणि तळातून आदिवासी तरुणांनी ही संघटना उभी केली. ही चळवळ प्रतिस्पर्धी चळवळ आहे, आपल्या प्रवाहाला शह देण्याकरिता ही चळवळ आहे अशा गैरसमजाने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वारली समाजातील पुढारी मंडळींनी ही चळवळ चेपण्याचा प्रयत्न केला.

९) भांडवली वर्तमानपत्रांनी मार्क्सवादी पक्षाला बदनाम करण्यासाठी या संघर्षाचा फायदा उठवला. मार्क्सवादी पुढारी मंडळींनी स्वतःचे समर्थन करण्यासाठी कष्टकरी संघटनेची चळवळ ही ख्रिश्चन मिशनऱ्यांची हस्तक चळवळ आहे, या चळवळीला परदेशातून मदत येते वगैरे प्रचार सुरू केला आणि आपल्या संघटित सामर्थ्याच्या जोरावर या नव्याने तळातून वाढणाऱ्या चळवळीवर हल्ले केले. सटाण्याच्या शेतमजूर परिषदेनंतर साथी बा. न. राजहंस आणि शेतमजूर परिषदेचे अध्यक्ष कॉ. संतराम पाटील या दोघांच्या संयुक्त प्रयत्नातून ग्रामीण कष्टकऱ्यांमध्ये काम करणाऱ्या विविध संघटनांचे एक व्यासपीठ म्हणून शेतमजूर समन्वय समितीची स्थापना झाली. कामगारवर्गाच्या व कष्टकरी जनतेच्या व्यापक चळवळीत क्रियाशील भाग घेण्याची भूमिका असल्यामुळे स्वाभाविकपणे कष्टकरी संघटना समन्वय समितीत सहभागी झाली. समन्वय समितीतर्फे मुंबईत जे धरणे झाले त्यात कष्टकरी संघटनेची भागीदारी चांगली होती. परंतु मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने समन्वय समितीतून कष्टकरी संघटनेला वगळावे अशी भूमिका घेतली. पण या त्यांच्या भूमिकेला इतर कोणाचाच पाठिंबा मिळाला नाही आणि सी. पी. एम. कार्यकर्त्यांनी समन्वय समितीतून बाहेर राहायचे ठरवले. कष्टकरी संघटनेला वगळता कामा नये अशी ठाम भूमिका लाल निशाण पक्षाच्या कार्यकर्त्यांनी घेतली होती. १९८५ मध्ये सार्वत्रिक निवडणुकांची प्रचार मोहीम चालू असताना समन्वय समितीच्या वतीने कोपरगाव येथे शेतमजूर व रोजगारहमी कामगारांची राज्य परिषद झाली. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष वगळल्यास इतर संघटनांनी या परिषदेत भाग घेतला आणि ही परिषद जोरदाररीतीने व शिस्तशीरपणे पार पडली. कोणीही परिषदेचे व्यासपीठ निवडणूक प्रचाराचे व्यासपीठ बनविले नाही.

१०) अलीकडील काळात ट्रेड युनियन चळवळ बांधण्याच्या क्रमात लाल निशाण पक्षाच्या ठाणे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचे आदिवासी समाजात संबंध बरेच विस्तारले आहेत. मिठागर कामगार, ट्रक कामगार, वाडी फळबाग कामगार, वीटभट्टी कामगार, गवत कापणी कामगार, इत्यादी व्यवसायांत आदिवासींचाच भरणा आहे. या कामगारांना किमान वेतनासाठी संघटित करताना व विशेषत: अगदी अलीकडे वनविकास मंडळाच्या कामगारांना संघटित करताना हे संबंध अधिकच विस्तृत व घनिष्ट होत आहेत. वनविकास कामगारांना किमानवेतन नुकतेच सुधारून मिळाले. तसेच मंडळाच्या कारभारातील अंदाधुंदीला संघटनेमुळे आळा घातला जात आहे. परिणामी समुहात विजयाची भावना आहे व संघटना उभारणीच्या क्रमांना खूपच गती आली आहे. अशा कार्याच्या

क्रमात लालनिशाण पक्षाचे कार्यकर्ते व कष्टकरी संघटनेचे कार्यकर्ते यांचे सहकार्याचे व परस्परविश्वासाचे संबंध स्वाभाविकपणे वाढले आहेत. त्यातूनच आम्ही दोन्ही संघटनांचे कार्यकर्ते ठरवून, नियोजनपूर्वक एकजुटीने एकदिलाने काम करण्याच्या निर्णयाला आलो आहोत.

११) आज ठाणे जिल्ह्यात आणि आदिवासी समाज मोठ्या संख्येने असलेल्या इतर जिल्ह्यांत अनेक तरुण बुद्धिजीवी स्त्री-पुरुष कार्यकर्ते सहानुभूतीच्या, करुणेच्या, तसेच राष्ट्रीय कर्तव्याच्या भावनेने काम करतात. प्रत्येकजण, त्याला त्याला जाणवणारा मुद्दा प्रमुख करून, काम करताना आढळतो. कोणी वेठबिगारीला, कोणी गमावलेली जमीन परत मिळवण्याला तर कोणी अतिक्रमित जमीन कायमची करून देण्याला, कोणी सामाजिक चालीरीती सुधारण्याला व व्यसनमुक्तीला तर कोणी शैक्षणिक संधी प्राप्त करून देण्याला, आदिवासी समाज जागृत, संघटित व स्वावलंबी व्हावा, या दृष्टीने प्राधान्य देतात. हे सर्व एकवटावे असाच आमचा प्रयत्न राहील. आम्हा दोघांचे सहकार्य म्हणजे तिसऱ्या कोणाशी तरी स्पर्धेची किंवा संघर्षाची तयारी असे कृपा करून कोणी मानू नये. तळच्या समाजाच्या उत्थापनासाठी प्रयत्नशील असलेल्या सर्वांशी सहकार्याची आमची भूमिका राहील. समूहांच्या हिताला बाधा येणार नाही आणि निर्णयाची पद्धत समूहाशी विचारविनिमयाची लोकशाही पद्धत असेल, याबद्दल सहकार्य करताना अर्थातच आमचा आग्रह राहील. इतर संघटनाशी व व्यक्तीशी सहकार्याचे संबंध जोडताना संयुक्त विचारविनिमयाने निर्णय घेण्याची आमची रीत राहील. ग्रामीण गरिबांच्या बाबतीत महाराष्ट्रभर क्रियाशील असलेल्या सर्वांना एकवटण्याचा प्रयत्न करणारे, महाराष्ट्र राज्य समन्वय समितीचे व्यासपीठ तूर्त काहीसे लुळे पडल्यासारखे झाले आहे. ते पुनः क्रियाशील करण्याची नितांत जरुरी आहे, असे आम्ही मानतो आणि त्या दिशेने त्या बाबतीत आमचे प्रयत्न राहातील,

१२) ताबडतोबीने आमच्या संयुक्त प्रयत्नांची दिशा आदिवासी समूह ज्या सर्व व्यवसायांत रोजगार करतात व जेथे त्यांची अत्यंत तुटपुंज्या वेतनावर लुबाडणूक केली जाते तेथे त्यांची व्यवसायवार ट्रेड युनियन संघटना उभारून त्यांचे सामर्थ्य संघटित करण्याची व वाढविण्याची राहील. मागासलेपणाचा फायदा घेऊन कामगार कायद्यांच्या सर्व लाभांपासून वंचित ठेवण्याचे जे प्रयत्न मालक, अधिकारी व शासन करते त्याविरुद्ध कामगार म्हणून वर्गपायावर संघटित करण्याला आम्ही ताबडतोबीने प्राधान्य देणार आहोत. त्याचबरोबर आदिवासींना हक्काने लागवडीसाठी जमीन मिळण्याचा प्रश्न आम्ही महत्त्वाचा मानतो. या प्रश्नांची निरनिराळी अंगे आहेत. जंगलात अतिक्रमण, बेकायदेशीर हस्तांतर याबरोबरच धरण व प्रकल्पग्रस्त आदिवासींचे विकसनशील पूनर्वसन इत्यादी सर्व अंगांवर संघटित आंदोलनाचा आमचा प्रयत्न राहील.

१३) कष्टकरी संघटनेने राजकीय शिक्षण शिबिरांचा जो पायंडा पाडला आहे त्याचा पद्धतशीरपणे विस्तार करण्याचा व त्याची खोली वाढविण्याचा आमचा संयुक्त प्रयत्न राहील. या सर्व प्रयत्नांचे टोक अर्थातच भांडवलदारवर्गाच्या सत्तेविरुद्ध आणि ती सत्ता चालविणाऱ्या इंदिरा काँग्रेस पक्षाविरुद्ध असणार आहे. तसेच विरोधी संसदीय भांडवली पक्षाचे भांडवलशाही वर्गस्वरूप उघड करून जनतेचा असंतोष त्यांना आपल्या शिडात घेता येणार नाही आणि त्यांच्या सरकारविरोधी पवित्र्याने जनतेची फसगत होणार नाही, कामगारवर्ग व कष्टकरी समाजशक्तींनी स्वतःचे स्वतंत्र, स्वावलंबी व्यापक एकजुटीचे राजकीय व्यासपीठ उभे केले पाहिजे अशी आमची भूमिका आहे.

१४) जागतिक शांततेचा, अण्वस्त्रबंदीचा राष्ट्रीय स्वातंत्र्याचा, सार्वभौमत्वाचा, अभंगत्वाचा. नववसाहतवादाला विरोधाचा, जातीयवादी, वर्णाश्रमवादी, वंशवादी फुटीर शक्तींच्या अमेरिकन साम्राज्यवाद्यांच्या भारतविरोधी कारवायांचा अशा सर्व प्रश्नांवर आमचे एकदीली मतैक्य आहे. या प्रश्नावरील व्यापक आंदोलनात क्रियाशीलपणे सहभागी होण्याचा आमचा निर्धार आहे.

१५) लाल निशाण पक्षाचे स्वरूप स्पष्ट आणि निश्चित आहे. परंतु कष्टकरी संघटनेचे स्वरूप स्पष्ट आकार घेण्याच्या क्रमात आहे. कष्टकरी संघटना हा राजकीय पक्ष नाही की ट्रेड युनियन संघटनाही नाही. ती कष्टकरी आदिवासी समूहांची, तरुणांची आपले जीवन बदलण्याची अस्मितायुक्त चळवळ आहे. मार्क्सलेनिनवादावर या चळवळीची श्रद्धा आहे आणि या शास्त्राच्या सहाय्याने आदिवासी युवकयुवतींचे आणि समूहांचे शिक्षण व संघटन व्हावे अशी या संघटनेने आपली भूमिका निश्चित केली आहे.

१६) वस्तुतः मार्क्सलेनिनवादाचे क्रांतिशास्त्र मानणारी, प्रत्येक देशात एकच एक मार्गदर्शक राजकीय संघटना असावी असा या क्रांतिशास्त्राचाच दंडक आहे. आम्ही दोन्ही संघटनांचे कार्यकर्ते हा दंडक मनोमनी मानतो. भारतात कामगार व ग्रामीण कष्टकरी यांच्या दोस्तीवर-सहकार्या-

वर आधारलेली लोकशाही क्रांती यशस्वी होण्यासाठी मार्क्स-लेनिनवादी शास्त्राने मार्गदर्शन करणारी कामगारवर्गावर व कष्टकरी जनतेवर आधारलेली एकच एक राजकीय संघटना निर्माण झाली पाहिजे. त्याशिवाय तरणोपाय नाही असे आम्ही मानतो. आज दुर्दैवाने आपल्या देशात मार्क्सलेनिनवाद मानणारी अनेक केंद्रे उभी राहिली आहेत. अजून उभी राहातआहेत. स्वतःस मार्क्सलेनिनवादी म्हणवणारे गट व व्यक्ती तर असंख्य आहेत. श्रमिकांचा क्रांतिकारक जाणतेपणा वाढण्याच्या क्रमात नकली व चुकीचे असेल ते नष्ट होईल व अस्सल व बरोबर असेल ते सर्व निरहंकारपणे क्रांतिकारक वर्गीय ऐक्याच्या भावनेने एकवटेल याबद्दल आम्हाला तिळमात्र शंका नाही. त्या दिशेनेच विनम्रपणे व ठामपणे आमचे संयुक्त प्रयत्न असतील अशी आम्ही या निवेदनाद्वारे अंतःकरणपूर्वक ग्वाही देऊ इच्छितो.

☆


आपले,

काळूराम धांगडा
भिकल्या धिंडा
जानभाऊ धांगडा
व्ही. सुरेश
प्रदीप प्रभू
(कष्टकरी संघटना)

राम घरत

मारुती पाटील
प्रल्हाद माळवदकर
वासुदेव जामसंडेकर
बिजपालसिंह वाघेला
गणपत जोधारी
(सर्व श्रमिक संघ)

---




(मुद्रक प्रकाशक अ. द. भोसले, श्रमिक जागृती मुद्रण फा. प्लॉ. ८२२, शिवाजीनगर, पुणे ५.)